NEHRU BAL PUSTAKALAYA

# मुत्थूची मनोराज्ये


कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्

अनुवाद

सुषमा सोनक

चित्रे

तपस गुहा



ISBN 81-237-2847-6
पहिली आवृत्ती : 1999 *(शके 1921)*
दुसरी आवृत्ती : 2001 *(शके 1922)*
तिसरी आवृत्ती : 2003 *(शके 1924)*
मूळ © कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्, 1990
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1999
Muthu's Dreams *(Marathi)*

**रु. 14.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.



A12433

नेहरू बाल पुस्तकालय

# मुत्थूची मनोराज्ये

कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्


अनुवाद
सुषमा सोनक


चित्रे
तपस गुहा

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया


मुत्थू हा एक छोटा मुलगा.


तो, त्याचे आईवडील आणि बहीण भावंडे एका लहानशा झोपडीत राहत.






रोज सकाळी त्याचे आईवडील शेतावर कामाला जात.






त्याचे भाऊ जमीनदाराची गुरे चारायला नेत.



आणि त्याच्या बहिणी लाकूडफाटा
गोळा करायला रानात जात.




मुत्थू अगदी एकटाच राहे.


पण त्याला कंटाळा कसा तो माहीत नसे. कडुनिंबाच्या डेरेदार सावलीत बसून तो बहारीची स्वप्ने रंगवे.



एकदा पक्षी उडतांना पाहून त्याच्या मनात तरंगून गेले, एके दिवशी आपणही असेच उडत उडत जाऊ.


गुंगून डोहातील मासे पाहतांना त्याला वाटले, एके दिवशी आपणही पाण्यात सूर मारू आणि माशांची गंमत पाहू.





त्याने समुद्राच्या लाटा पाहिल्या. तेव्हा त्याला वाटले, आपण ह्या फेसाळणाऱ्या प्रचंड लाटा पार करून जाऊ आणि समुद्रापल्याड काय आहे ते पाहू.








आणि दिवेलागणीला घरातील सारीजणे कडुनिंबाच्या गार सावलीत जरा विसावत, तेव्हा मुत्थू आकाशाकडे बघू लागे. चंद्र पाहतांना नेहमीच त्याच्या मनात येई की कधीतरी आपण चंद्राला हात लावावा.




मुत्थूने आपल्या वडिलांना आपली स्वप्ने सांगितली. ते म्हणाले, ‘‘माणसं उडू शकत नाहीत. लोक पाण्याखाली तग धरू शकत नाहीत. माणसं समुद्र ओलांडू शकत नाहीत; तो केवढातरी मोठा आहे.


"आणि माणसं चंद्राला कधीच हात लावू शकत नाहीत. म्हणून स्वप्ने पहायचे सोडून गप झोपा."




मुत्थूने आपल्या भावांना आपली मनोराज्ये सांगितली. ते हसले आणि म्हणाले, "वाहवा! तुला आमच्याइतकं जोरात धावताही येत नाही आणि म्हणे मला उडायचंय. हो, हो, हो!"




मुत्थूने आपल्या बहिणींना आपली मनोराज्ये सांगितली. त्याची ताई म्हणाली, ''मुत्थू, मुत्थू, तू उडायला शिकलास ना, की मी तुझ्याबरोबर येणार हं.''







लहानी म्हणाली, ''मुत्थू, मुत्थू, तू चंद्रावर गेलास की मलापण तिथे कसं यायचं ते सांग, बरं का.''

मधली म्हणाली, "मुत्थू, मुत्थू, मला का नाही रे तुझ्यासारखी स्वप्नं पाहता येत?"






मग एके दिवशी गावात एक माणूस आला. त्याच्या खांद्याला एक थैली होती, जवळ काही पुस्तकं होती. मी शिक्षक आहे, असं तो म्हणाला. मुत्थू नेहेमी निंबाच्या सावलीत बसून आपल्या मनोराज्यात गुंग व्हायचा, नेमकी तिथेच त्याने आपली शाळा भरविली.



गुरुजींनी मुत्थूला कितीतरी नव्या गोष्टी शिकविल्या. त्यांनी त्याला लिहाय-वाचायला, चित्रे रंगवायला आणि गाणी गायला शिकविले.






त्यांनी मुत्थू आणि इतर मुलांना अनेक नवलाईच्या गोष्टी सांगितल्या.


मुत्थूला आपले गुरुजी फार आवडत. त्याने गुरुजींना आपली मनोराज्ये सांगितली. गुरुजींनी त्याचे सगळे नीटपणे ऐकून घेतले. ते म्हणाले, "पंख नसले तरी तुला नक्कीच उडता येईल. विमान तुला अगदी उंचावर घेऊन जाईल, पक्षी उडू शकतात त्याहीपेक्षा उंच."







"तुला माशांसारखे कल्ले नसले तरी तू पाणबुडीत बसून पाण्याखाली जाऊ शकतोस आणि तुझ्या कल्पनेतही नसेल इतक्या खोलवर पोहोचू शकतोस.

"आणि तुला दर्यापार जाऊन तिथली दुनिया पहायची असली तर काय, सोपं आहे. तू एका मोठ्या जहाजातून प्रवास करु शकतोस, अन् मग लाटाबिटांची भीती वाटणारच नाही.






"ओहो! आणि चंद्रावर स्वारी! एके काळी हे स्वप्नातही खरं वाटलं नसतं. पण माझ्या छोट्या मित्रा, आता तर माणूस थेट चंद्रावर देखील पोहोचलेला आहे.







"कदाचित तू अंतराळवीर होशील, गागारीनसारखा, राकेश शर्मासारखा. अन् मग तू सुद्धा चंद्रावर जाशील.

मुत्थू ऐकत होता. त्याचा आनंद आणि उत्साह मनात मावेनासा झाला.






तो मोठा होईल आणि वैमानिक बनेल, खलाशी, संशोधक किंवा अंतराळवीर सुद्धा.



वा तो एक जाणता शिक्षक होईल, आणि आपल्यासारख्या ईतर मुलांना शिकवेल—"स्वप्ने खरी होतात बरं का."



Printed at Aravali Printers & Publishers Pvt. Ltd., Okhla, Phase-II, N.D.-20



रु. 14.00 ISBN 81-237-2847-6

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया